## संपादकीय....

# अखेर त्यांना मिळाली 'ओळख' रुग्णांच्या नातेवाईकांचा लागणार शोध!

शहरातील रेल्वे, बस स्थानक, मंदिर, मशीद किंवा दर्ग्यावरील बेघर व मानसिक रुग्णांना विविध स्वयंसेवी संस्थांनी येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात दाखल केले. त्यांना दाखल करताना संस्थांनी त्यांना विजय, विमल, जॉन, मेरी, अकबर किंवा शबाना अशी नावे दिली. ते उपचार घेऊन बरे झाले, तरीही त्यांच्या कागदपत्रांवर त्यांची ओळख दाखल करतानाचीच नावे राहिली. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या विशेष प्रयत्नातून मनोरुग्णालयातील बेघर साडेतीनशे रुग्णांचे आधारकार्ड काढले. त्यामुळे त्यांना आता नवीन ओळख मिळाल्यामुळे त्यांच्या पुनर्वसनाचा मार्ग सुद्धा मोकळा झाला आहे. यासह बरे झालेल्या रुग्णांच्या नातेवाईकांचा शोध लागणार आहे. त्यामुळे रुग्ण त्यांच्या घरी जाऊ शकतील अशी आशा आहे.

'येरवडा मनोरूग्णालयांमध्ये साडेचारशेपेक्षा अधिक बरे झालेले रुग्ण आहेत. यातील काही बेघर तर काहींना त्यांचे नातेवाईक घरी घेऊन जात नाहीत. त्यामुळे त्यांचा अनेक वर्षांपासून मुक्काम मनोरुग्णालयातच आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न मनोरुग्णालय प्रशासन प्रयत्नशील आहे. मात्र, त्यांच्याकडे कोणतीच कागदपत्रे नसल्याची मुख्य अडचण होती. कारण पुणे रेल्वे स्थानकावर, बस थांब्यावर, मंदिर, मशीद, दर्ग्याजवळील मनोरुग्णांना विविध स्वयंसेवी संस्था, पोलिसांनी न्यायालयाच्या आदेशाने मनोरुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यावेळी त्यांच्याकडे कोणताच कागदोपत्री पुरावा नसल्यामुळे त्यांना संबंधितांनी ज्या नावाने सरकारी कागदपत्रात नोंद केली तीच त्यांची ओळख झाली.

पुणे जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांनी विशेष बाब म्हणून साडेतीनशे रुग्णांचे आधारकार्ड काढण्याची परवानगी दिली. त्यावर त्यांची रुग्णालयात दाखल असलेल्या नावांचा उल्लेख होता. मात्र, त्यांच्या नातेवाईकांचा शोध लागल्यानंतर आधार कार्डवर त्यांच्या नावाची दुरुस्ती होऊ शकते. आधार कार्डमुळे त्यांच्या नातेवाईकांचा शोध लागणार आहे. त्यासोबतच भविष्यात त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सुद्धा सुटेल.

'सर्वोच्च' न्यायालयाच्या आदेशाने मनोरुग्णालयात अनेक वर्षे वास्तव्य असलेल्या रुग्णांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. त्यांना भाजी निवडणे, चहा करणे, बागकाम अशा दैनंदिन कामे शिकविली जाणार आहेत. त्यांची आवड, छंद आणि कौशल्याचा विचार करून त्याप्रमाणे त्यांचे पुनर्वसन केले जाणार आहे. त्यासाठी त्यांचे बँकेचे बचत खाते काढण्यासाठी आधारकार्डचा वापर होऊ शकतो.

मनोरूग्णालयातील अनेक बरे झालेल्या रूग्णांच्या पुनर्वसनासाठी अनेक संस्था पुढे आल्या आहेत. अनेकांनी रुग्णांना घेऊन गेले आहेत. पण त्यांची देखभाल नीट होते का याची पाहणी केली जात नाही. त्यामुळे रुग्णांची अवस्था आगीतून उटले आणि फुफाट्यात पडले अशी अवस्था झाली आहे.

काही वर्षांपूर्वी परिवर्तन संस्था मनोरुग्णालयात रूग्णांच्या पुनर्वसनासाठी विविध उपक्रम राबवित होते. बरे झालेल्यांना देवराईत ठेवले जात होते. त्यांना कागदी पिशव्या, आकाशकंदील, फाईल बनविण्याचे प्रशिक्षण दिले जात होते.त्यामुळे त्यांच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण झाला होता. मात्र हा प्रयोग फार काळ राहिला नाही.

बापू ट्रस्टने महिला रूग्णांचे वस्तीपातळीवर पुनर्वसन केले होते. रुग्णांना स्वतंत्र घर घेऊन दिले होते. रुग्ण बाहेर कामाला जाऊन घरी येत असत. हा प्रयोग ज्या महिला बरे झाले आहेत मात्र त्यांना त्यांचे नातेवाईक घरी घेऊन जात नाहीत. त्यांच्यासाठी हा प्रयोग केला गेला होता. मात्र हा सुद्धा प्रयोगच राहिला. त्यामुळे सरकारी पातळीवर बरे झालेल्या रुग्णांसाठी ठोस उपाययोजना केल्या गेल्या पाहिजेत.

अनेक रुग्ण तर आपली मूळ गावे, कुटुंबं, नातेवाईक विसरूनच बसले आहेत. एवढी वर्षं रुग्णालयात राहिल्यामुळे त्यांचं बाहेरचं आयुष्यच संपलं. त्यामुळे अचानक त्यांना घरी न्यायचं म्हटलं तरी ते कसं जुळवून घेणार हा प्रश्न उभा राहतो. खरं तर फक्त आधारकार्ड करून चालणार नाही, तर त्यांना परत समाजात मिसळण्यासाठी वेगळं मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि सातत्याने साथ देणं गरजेचं आहे.

आजकालच्या धकाधकीच्या आयुष्यात कुटुंबीयांनाही आजारपण सांभाळणं हा भार वाटतो. म्हणूनच काहीजण मुद्दाम रुग्णांना परत न्यायला तयार नसतात. हे वास्तव थोडं कठोर आहे, पण खरी परिस्थिती अशीच आहे. त्यामुळे सरकारनं पुनर्वसनासाठी स्वतंत्र वसतिगृहं, शाळा, रोजगार केंद्रं यांसारख्या सुविधा उभारल्या तरच हे रुग्ण पुन्हा सामान्य जगणं जगू शकतील.

एकेकाळी रस्त्यावरून उचलले गेलेले हे रुग्ण आता बरे झालेत, पण त्यांना अजूनही घर मिळालेलं नाही. हा विरोधाभास फार मोठा आहे. कोणी त्यांना दया दाखवतो, कोणी सेवा करतो, पण दीर्घकालीन पातळीवर ठोस धोरणं केल्याशिवाय या माणसांचं खरं पुनर्वसन होणार नाही. फक्त उपक्रम म्हणून थोडे दिवस चालणाऱ्या योजना सुरू करून बंद करणं म्हणजे त्यांच्याशी पुन्हा अन्यायच ठरेल.

म्हणूनच समाजानेही आपली मानसिकता बदलणं गरजेचं आहे. मनोरुग्ण म्हणजे वेगळ्या जगातले नाहीत, ते आपल्या सारखेच आहेत, फक्त त्यांना आधार आणि ओळख हवी आहे. आज त्यांना मिळालेलं आधारकार्ड ही चांगली सुरुवात आहे, पण ती शेवट ठरू नये. त्यांच्या आत्मसन्मानाने जगण्याचा अधिकार खऱ्या अर्थानं समाजाने आणि सरकारने मिळून द्यायला हवा.

# कोल्हापूर चित्रनगरी विकासाच्या वाटेवर!






कोल्हापूर म्हटले की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे उमदे व्यक्तिमत्व डोळ्यापुढे येते. श्री अंबाबाई, श्री जोतिबा, गड, किल्ले, जंगल, घाट, वने, धरणे, तांबडा-पांढरा आणि येथील खाद्य संस्कृती डोळ्यापुढे येते. मात्र, आता हे शहर लवकरच आणखी एका वेगळ्या वैशिष्ट्यासाठी ओळखले जाणार आहे. ते म्हणजे कोल्हापूरची चित्रनगरी. राज्य शासनाने मुंबईतील गोरेगाव फिल्मसिटी, हैदराबादच्या रामोजी फिल्मसिटी प्रमाणेच कोल्हापूरच्या चित्रनगरीचा विकास करण्याचे निश्चित केले असून मोठ्या प्रमाणात या ठिकाणी विकास कार्य हाती घेतले आहे.

कोल्हापूरची चित्रनगरी नव्याजोमाने, नव्या रूपात, नव्या दमात उभी राहत आहे. कोल्हापूर आणि चित्रपट निर्मिती याचे नाते तसेच जुनेच आहे. इथल्या मातीत चित्रपट प्रेम रुजले आहे. शाहू महाराजांसारख्या कलासक्त माणसाच्या मशागतीत तयार झालेल्या या शहराने चित्रपटाशी आपले नाते कायम ठेवले आहे. शहराचे नाव इथल्या मातीत रुजलेल्या चित्रपट प्रेमामुळेही खास आहे. दिग्दर्शक, निर्माते, लेखक, तंत्रज्ञ यांच्यासाठी कोल्हापूर ही केवळ एक जागा नसून, एक शाळा आहे, असे वक्तव्य नुकतेच ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी राजर्षी शाहू महाराज जीवनगौरव पुरस्कार स्वीकारताना केले. त्यांच्या या विधानातून कोल्हापूरच्या चित्रसांस्कृतिक वारशाचा गौरव अधोरेखित होतो.

कोल्हापूरने भारतीय चित्रपटसृष्टीला भालजी पेंढारकर ,राजा परांजपे, बाबुराव पेंटर, व्ही. शांताराम, अरुण सरनाईक, बाळकृष्ण नरके,चंद्रकांत, सूर्यकांत मांढरे, मास्तर विनायक, बाबुराव पेंढारकर, अनंत माने, सुलोचना, आशा काळे, उषा नाईक अशा कितीतरी दिग्गजांची देणगी दिली आहे. दादा कोंडके, लता मंगेशकर आणि मंगेशकर भगिनी, राजदत्त यांच्यासह दिग्गज संगीतकार, संगीतसूर्य केशवराव भोसले अशा कितीतरी नावांनी कोल्हापूरचे नाव सिने - नाट्य क्षेत्रामध्ये अजरामर केले आहे. अनेक कलाकारांसाठी त्यांच्या आयुष्यात कोल्हापूर हे कलाक्षेत्राचे उगम स्थान ठरले आहे. यामध्ये प्रभात फिल्म कंपनीचा नामोल्लेख आवश्यक ठरतो. कोल्हापूरने शालीनी सिनेटोन, जयप्रभा स्टुडीओचाही एक सुवर्ण काळ अनुभवला आहे. चित्रपट कसा तयार करायचा हे तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी चेन्नईपासून कराची पर्यंतची अनेक मंडळी पूर्वीच्या काळी कोल्हापूरला येत असत. गांधी पिक्चर साठी पहिले ऑस्कर मिळवलेल्या भानु आथय्या मूळच्या कोल्हापूरच्या. ग.दि. माडगूळकर, सुधीर फडके यांची कारकीर्दही कोल्हापुरातून सुरू झाली. एवढेच काय पृथ्वीराज कपूर, राज कपूर यांनीही भालजी पेंढारकर यांच्या चित्रपटांमध्ये भूमिका केल्या आहेत. त्यामुळे कोल्हापूरचे नाव चित्रपटांपासून वेगळे करता येत नाही.

याच चित्रप्रेमाला सन्मान देताना महाराष्ट्र शासनाने कोल्हापूरमध्ये १९८५ मध्ये कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाची स्थापना केली. करवीर तालुक्यातील मोरेवाडी येथील ७८ एकर जागेत ही चित्रनगरी उभारण्यात आली. मात्र, मधल्या काळात ही संस्था तोट्यात गेल्याने बंद करण्याचा निर्णयही घेतला गेला. पण कोल्हापूरकरांच्या मागणीला दाद देत शासनाने २००८ मध्ये पुन्हा चित्रनगरी पुनरुज्जीवित करण्याचा निर्णय घेतला.आता मात्र कोल्हापूरची चित्रनगरी नफ्यामध्ये घोडदौड करत आहे. या चित्रनगरीला आता वेध लागले आहे, मोठ्या बिग बजेट निर्मितीच्या कार्याचे.

चित्रनगरीचा पुनर्विकास करण्यासाठी कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार 'एमआयडीसी'ने पायाभूत सुविधांच्या विकासाला गती दिली आहे. यामध्ये अंतर्गत रस्ते, शूटिंगसाठी रेल्वे स्टेशन, चाळ, वाडा, मंदिर आदी स्थळांची निर्मिती करण्यात आली आहे. शुटींगसाठी ही स्थळे उभी झाली आहे. दोन मोठे स्टुडिओ या ठिकाणी उभे झाले आहे. तंत्रज्ञ, कारागीर, कलाकार व मान्यवरांसाठी दोन विश्रामगृहांचीही बांधणी झाली आहे.

या चित्रनगरीमध्ये गेल्या तीन वर्षांत असा कोणताही दिवस गेलेला नाही, ज्या दिवशी शूटिंग झालेले नाही. मालिका, सिनेमे, प्रादेशिक चित्रपट यांच्या चित्रीकरणाने हे स्थळ सदैव गजबजलेले असते. मुंबईतील शूटिंगला लागणारी परवानगी प्रक्रिया, खर्च आणि गर्दी यामुळे आता निर्माते पर्याय शोधत आहेत. अशा वेळी कोल्हापूरसारखी चित्रनगरी हा एक उत्कृष्ट पर्याय बनत आहे. येथील मोठ्या आकाराचे सेट, खुली जागा, कमी खर्च, स्थानिक सहकार्य आणि निसर्गरम्य वातावरण यामुळे दक्षिण भारतातील निर्मातेही येथे येऊ लागले आहेत.

राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते चित्रनगरीतील नव्या सुविधांचे उद्घाटन व लोकार्पण होत आहे. यामध्ये भविष्यातील आवश्यकतेनुसार अत्याधुनिक पोस्ट-प्रोडक्शन स्टुडिओचेही भूमिपूजन करण्यात येणार आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सहपालकमंत्री माधुरी मिसाळ आदींचीही उपस्थिती यावेळी असणार आहे. यामुळे या प्रकल्पास राजकीय पातळीवरही सक्रिय पाठबळ मिळत आहे.

तत्कालीन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या प्रकल्पाकडे विशेष लक्ष दिल्यामुळे पायाभूत सुविधा विकसित झाल्या. ही सुरुवात आज पुढच्या टप्प्यात प्रवेश करत आहे. कोल्हापूरची ही चित्रनगरी आता केवळ एक चित्रपटस्थळ न राहता, रोजगार निर्मितीचे मोठे केंद्र बनत आहे. एक पर्यटन स्थळ बनत आहे. एका प्रकल्पासाठी हजारो जणांची गरज भासते. त्यामुळे कलाकार, तंत्रज्ञ, सेट डिझायनर, खानपान, हॉटेल व्यवसाय, वाहनसेवा, सुरक्षा, साउंड, लाईटिंग अशा अनेक सेवा आणि व्यवसायांना यातून चालना मिळत आहे.

हे सर्व लक्षात घेतले तर स्पष्ट होते की कोल्हापूर चित्रनगरीचा विकास हा आता फक्त स्वप्न राहिलेले नाही, तर तो प्रत्यक्षात आकार घेत आहे. गोरेगाव फिल्मसिटी किंवा रामोजी फिल्मसिटीप्रमाणे कोल्हापूर चित्रनगरीही भविष्यात एक नवीन पर्यटनस्थळ म्हणून नावारूपाला येईल. कोल्हापूरच्या विकासात आणि सांस्कृतिक ओळखीत ही चित्रनगरी महत्त्वाची भूमिका निभावणार आहे.

एकूणच, कोल्हापूर चित्रनगरी विकासाच्या वाटेवर असून ती लवकरच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आर्थिक नकाशावर ठळकपणे झळकणार आहे.

**प्रवीण टाके उपसंचालक (माहिती)**
**कोल्हापूर विभागीय कार्यालय**
**कोल्हापूर**

# काव्य गोष्टी!






लाजून हासणे अन..... पाडगावकरांच्या या गाण्याने येते गालिबची आठवण!

**लाजून हासणे अन् हासून हे पहाणे**
**मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे!**
**डोळ्यांस पापण्यांचा का सांग भार व्हावा?**
**मिटताच पापण्या अन् का चंद्रही दिसावा?**
**हे प्रश्न जीवघेणे हरती जिथे शहाणे**
**मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे**
**हाती धनुष्य ज्याच्या त्याला कसे कळावे?**
**हृदयात बाण ज्याच्या त्यालाच दुःख ठावे!**
**तिरपा कटाक्ष भोळा, आम्ही इथे दिवाणे**
**मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे**
**जाता समोरुनी तू उगवे टपोर तारा**
**देशातुनी फुलांच्या आणी सुगंध वारा**
**रात्रीस चांदण्याचे सुचते सुरेल गाणे**
**मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे**
**लाजून हासणे अन् हासून हे पहाणे**
**मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे**

'आनंदकंद' हे वृत्त बहुतेक कवींचे आवडते वृत्त असते! याचे कारण, हे वृत्त काव्यरचना करण्यास तसे सोपे वृत्त आहे. त्यामुळे जर शोध घ्यायचा म्हटलं तर, बहुतेक लोकप्रिय कवींनी या वृत्तात अनेक रचना लिहिल्याचे जाणवेल!

आनंदकंद वृत्त हे अक्षर गण वृत्त आहे. त्याचे लक्षण गीत ताराप राधिका गा, ताराप राधिका गा! असे आहे. खरेतर अक्षर गण वृत्तात लग क्रम म्हणजे लगावली सांभाळली जाते, त्या वेळी मात्रा मोजण्याची गरज नसते. पण मात्रा मोजल्यास

**त्या २४ असतात!**
**आणि लगावली क्रम -**
**गा गा ल गा ल गा गा**
**असा असतो!**

लाजून हासणे ही रचना - भावगीत कवी मंगेश पाडगावकर यांच्या लेखणीतून साकार झाले आहे. या सुंदर भावकवितेला तितकीच समर्पक चाल आणि संगीत दिले आहे श्रीनिवास खळे यांनी, तर गायले आहे हृदयनाथ मंगेशकर यांनी!

मंगेश पाडगावकर यांचा विचार करायचा म्हटल्यास , त्यांनी या आनंदकंद वृत्तात अनेक कविता, भावगीते, आणि गझला सुध्दा लिहिल्या आहेत.

पाडगावकरांचे हे भावगीत मला व्यक्तीशा खूपच आवडते! आजही हे गीत मी अधूनमधून गुणगुणत असतो. अर्थात हे गाणे मी अगदी शाळकरी म्हणजे कळत्या वयापासूनच गुणगुणत होतो. पण या मराठी भावगीतांची गोडी, अधिक करून महाविद्यालयीन वयात अधिकच लागली. त्या काळात मी सदाशिव पेठेतील, रेडिओ स्टार पंडित कमलाकर जोशी यांच्याकडे सुगम संगीत क्लास मध्ये, सुगम संगीत शिकायला जायचो. तेंव्हा तिथे मी माझ्या आवडीची अरूण दाते, हृदयनाथ मंगेशकर यांनी गायलेली गाणी , भावगीते, भजन आदी अधिक प्रमाणात गायचो, गायला शिकायचो!

विशेष करून अरूण दाते यांनी गायलेली गाणी, भावगीते जास्त करून गात असे!

पंडित कमलाकर जोशी सर हे अंध होते. त्यांचे शिकवणे सुंदरच होते. ते मला म्हणायचे श्रीकांत तू अरूण दातेंनी गायलेली गाणी अतिशय सुंदर गातोस

अर्थात आमच्या घरी तेंव्हा टेपरेकॉर्डर होता, आणि अरूण दाते, महम्मद रफी, आणि इतरही अनेक लोकप्रिय गायकांच्या कॅसेट भरपूर प्रमाणात होत्या. त्यामुळे कॅसेट लावून, आवडत्या गाण्यांची पारायणे, आणि रियाज भरपूर होत असे!

पाडगावकरांची लाजून हासणे अन् हासून हे पहाणे ही रचना अतिशय प्रासादिक आहे. यातील विशेष करून एक कडवे, मला नेहमी मिर्झा गालिब यांच्या एका शेराची आठवण करून देते!

ते कडवे म्हणजे

**हाती धनुष्य ज्याच्या त्याला कसे कळावे?**
**हृदयात बाण ज्याच्या त्यालाच दुःख ठावे!**
**तिरपा कटाक्ष भोळा, आम्ही इथे दिवाणे**
**मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे**

या ओळी थेट गालिबच्या,

**ये न थी हमारी किस्मत, कि विसाल-ए- यार होता**
**अगर और जीते रहते, यही इंतिजार होता**

या गझल मधील एका शेराशी थेट नातं सांगणाऱ्या आहेत, तो शेर असा

**कोई मेरे दिल से पूछे, तिरे तीर-ए-नीम कश को**
**ये खलिश कहाँ से होती, जो जिगर के पार होता**

अर्थ असा की, कुणी माझ्या हृदयाला विचारायला हवे, तुझ्या नयनांच्या अर्ध - तिव्र बाणाने (अर्धा उरात गेलेला, अर्धा बाहेर राहिलेल्या) माझ्या हृदयाची काय अवस्था - अस्वस्थता (खलिश) झाली आहे, पण खरं सांगू, या प्रेमाच्या वेदनेत, अर्धा उरात घुसलेल्या, बाणाने एक आगळीच मजा अनुभवतो आहे, ही अस्वस्थता पुन्हा पुन्हा अनुभवत रहावी, हे दुःख चघळत रहावे असे वाटते, तुझ्या तिरप्या नजरेचा कटाक्ष - बाण माझ्या हृदयात जाऊन अडकून राहिला, त्यामुळे अधिक मजा येत आहे.

हा बाण- तीर जर जिगरच्या पार झाला असता, तर, छे या मजेला मी ठार मुकलो असतो. त्यामुळे तुझ्या नजरेचा बाण उरातच राहिला, यात खरी न्यारीच लज्जत आहे असे गालिबला म्हणायचे आहे.

यावरच पाडगावकर म्हणतात ज्याच्या हातात बाण आहे त्याला 'बाण' झेलण्याची मजा वा दुःख काय कळणार? ज्याच्या उरात तो शिरला त्यालाच ती मजेची वेदना अनुभवता येणार, पण हा तिरपा कटाक्ष बाण जो आहे, तो प्रेयसीचा आहे आणि तो तिने जाणून बुजून नव्हे तर निष्पापपणे, भोळेपणाने मारलेला आहे, मारल्या गेलेला आहे, पण कसे का असेना, आम्ही तर त्या भोळेपणात मारलेल्या बाणाने घायाळ होऊन दिवाणे झालोच

असो, गालिबच्या त्या गझलेची आणि शेराची आठवण, पाडगावकरांच्या या गाण्याने नेहमीच ताजी होते!

सलाम गालिबला आणि अर्थातच पाडगावकरांनाही! पुन्हा इथे हिंदीतील एक कहावत आठवते नकल में भी, अकल की जरूरत होती है!

**श्रीकांत वाघ पुणे**
**भ्रमणध्वनीः ९९२३३१ ६२११**

# स्किझोफ्रेनिया होण्याची कारणे व उपचार



**सौ.रोहिणी भोसले-शेख**

स्किझोफ्रेनिया ह्या आजाराबाबत आपण ऐकत असतो पण सविस्तर माहिती नसते म्हणूनच लोकांना या आजाराबाबत माहिती मिळावी व तसेच ह्या आजाराबाबत उपचार लवकर सुरु केल्यास हा आजार आटोक्यातही येऊ शकतो .

स्किझोफ्रेनिया या आजाराबाबत सोप्या भाषेत माहिती देण्याचा हा एक माझा प्रयत्न ....

**स्किझोफ्रेनिया म्हणजे काय ?**

स्किझोफ्रेनिया यालाच मराठी मध्ये छिन्नमनस्कता असे म्हटले जाते किवा दुभंगलेले मन अशी हि स्किझोफ्रेनियाची ओळख आहे.हा एक गंभीर मानसिक आजार आहे. भास व भ्रम तसेच मनाचा विचारांचा गोंधळ होणे व वर्तनांत बदल होणे हे या विकृतीचे मुख्य लक्षण आहेत .या आजाराची सुरुवात युवा अवस्थेत होऊ शकते.लवकर उपचार घेतले तर नक्कीच हा आजार आटोक्यात राहू शकतो. रुग्ण हा सर्वसामान्य लोकांप्रमाणे आपले जीवन व्यतीत करू शकतो. स्किझोफ्रेनिया आजाराला असे नाव का पडले तर संशोधक सांगतात कि ग्रीक भाषेमध्ये स्कीझीन म्हणजे दुभंगलेले मन आणि फ्रेन म्हणजे मन असा ह्या आजाराच्या दोन शब्दावरून स्किझोफ्रेनिया असे नाव पडले. स्किझोफ्रेनिया हा शब्द प्रथम युजेन ब्ल्यूलर या प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ यांनी प्रथम वापरला म्हणून यांना स्किझोफ्रेनिया या आजाराचे जनक म्हणतात.

**स्किझोफ्रेनिया होण्याची कारणे कोणती ?**

मानसोपचारतज्ज्ञ यांच्या मते ह्या आजार होण्याची कारणे असंख्य आहेत. अनुवंशिकता, मेंदूमध्ये होणारे रासायनिक बदल, कौटुंबिक समस्या, स्पर्धात्मक आयुष्य, व्यसनांमुळे इत्यादी अनेक कारणे आहेत. जी स्किझोफ्रेनिया या आजाराला कारणीभूत आहेत.

**स्किझोफ्रेनिया या आजाराची लक्षणे कोणती ?**

या विकृतीमध्ये पुढीलप्रमाणे प्रमुख लक्षणे आढळतात ....

१) भ्रम होणे
२) भास होणे
३) विचार करतना अडथळा निर्माण होणे
४) प्रेरणेची कमतरता
५) आपल्या भावनांना नित व्यक्त न करता येणे
६) समाजापासून लोकांपासून दूर राहणे
७) संशय घेणे
८) पुटपुटने
९) सतत बडबड करणे, असंबद्ध बडबड करणे.
१०) हसत राहणे
११) अस्वछ राहणे, आंघोळ न करणे,

इत्यादी महत्वाची व माहित असलेली लक्षणे दिसून येतात ..

**स्किझोफ्रेनिया या आजारावर उपचार कसे करतात ?**

स्किझोफ्रेनिया या आजाराला जितक्या लवकर ओळखता येईल तितक्या लवकर रुग्ण बरे होतात.त्यासाठी औषधोपचार सुरु करणे गरजेचे असते. अश्या रुग्णांना पुढील प्रमाणे उपचार केले जातात. आजारची तीव्रता पाहून डॉक्टर रुग्णांस बाह्यरुग्ण विभाग किंवा रुग्णालयात दाखल करून उपचार देतात.

१) औषधोपचार
२) ECT / **विद्युत झटका देणे**
३) सायकोथेरपी
४) समुपदेशन
५) कौशल्य प्रशिक्षण

याच बरोबर रुग्ण व नातेवाईक यांनी इच्छाशक्ती असणे जरुरी आहे. वेळोवेळी उपचारास हजर राहणे हि तितकेच महत्वाचे आहे. दररोज रुग्णांना औषधे देणे गरजेचे आहे. त्याचबरोबर प्राणायम, योगा, शारीरक व्यायाम, छोटी छोटी कामे देणे तसेच रुग्णांनी आपले छंद जोपासणे हि महत्वाचे आहे.

कोणत्याही आजाराला उपचार हे असतातच... आणि ह्यासाठी दृढनिश्चय हि तितकाच महत्वाचा असतो. सरकारी रूग्णालय, खाजगी रुग्णालय, पुनर्वसन केंद्र येथे स्किझोफ्रेनिया या आजारावर उपचार घेऊ शकतात. आपल्या वागण्यात विचारात बदल जाणवल्यास त्वरित आपल्या नातेवाईक, मित्रपरिवार यांना जरूर सांगावे किंवा नातेवाईक-मित्रपरिवार यांना जर बदल जाणवल्यास त्वरित उपचार सुरु करावेत.

जाता जाता अतुल कुलकर्णी यांनी अभिनय केलेल्या देवराई या सिनेमातील कवितेच्या चार ओळी खास अश्या रुग्णांना व नातेवाईक यांना समर्पित...

**नाही हाकारा, पण उठले रान**
**घरटे सापडेना वाट**
**बेभान पाखरू, समजेना कोणा**
**का कल्लोळ कल्लोळ .....**

'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे- ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.
वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.
मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे – ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com